# भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये महिलांच्या विकासासाठी करण्यात आलेल्या कायद्याच्या अनुषंगाने हिंदू कोड बिलाची भूमिका

संशोधक
**यशवंत नरहरी जाधव**
पीएच. डी.
समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

संशोधन मार्गदर्शक
**डॉ. दिलीप सिताराम मस्के**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
वेणुताई चव्हाण प्रतिष्ठान संचलित,
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड.

**प्रस्तावना :**

कोणत्याही समाजातील स्त्रियांच्या दर्जाचे मूल्यांकन हे त्या समाजाच्या विशिष्ट चौकटीत राहूनच केले जाते. स्त्रीची समाजातील भूमिका व तिचे स्थान देखील फार मोठ्या प्रमाणावर या घटकानुसारच ठरत असते. कोणत्याही समाजाच्या, राष्ट्राच्या प्रगतीत स्त्रियांना विशेष महत्त्व दिले जाते. स्त्री ही एक स्वतःच शक्ती नाही तर ती एक प्रकारची समाजाची जननी, माता आहे, असे अगदी पूर्वीपासून आपण मानीत आलेलो आहोत. स्त्री पुरुषांमध्ये असलेल्या शारीरिक भिन्नतेमुळे स्त्रियांचे स्थान हे दुय्यमच झालेले नाही, तर इतिहासात व आजही भिन्न समाजव्यवस्थांनी स्त्री-पुरुषांच्या शारीरिक भिन्नतेला जो अर्थ दिला आहे त्यामुळे स्त्रियांची वेगवेगळ्या क्षेत्रात, वेगवेगळ्या प्रकारे पिळवणूक होत असलेली आपणास दिसून येते. अनेक शतके स्त्री अनेक अर्थाने दास्यत्वांच्या अंधारातून वाढ काढीत चाललेली आहे. त्यामुळे स्त्रीचे समाजातील स्थान, तिची भूमिका तिच्या समस्या, तिचे स्वातंत्र्य, तिचे हक्क आणि कर्तव्य याविषयी अनेक वर्ष चर्चा झाली आहे.

CC BY Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

जगातील इतर देशाप्रमाणेच भारतीय समाजातील स्त्रियांचे प्रश्न भारतामध्ये महत्त्वाचे बनले. चार भिंतीच्या आत स्त्री जीवन कोंडलेले होते. वैदिक काळ तसा स्त्रियांसाठी चांगला होता. पण उत्तर वैदिक काळापासून स्त्रियांच्या समस्यांना सुरुवात झाली. या काळात हिंदू कायदा मुख्यत्वे वेद, स्मृती इत्यादी ग्रंथावर आधारलेला होता. स्त्रीला दुय्यम स्थान असल्यामुळे हिंदू कायद्यात स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून कुठलाच

अधिकार नव्हता. स्त्री सर्व कौटुंबिक हक्कापासून वंचित झाली होती. १९ व्या शतकात स्त्रियांच्या प्रश्नांचे विचारमंथन होऊ लागले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रियांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले गेले. काही समाजसुधारक पुढे आले व त्यांनी या प्रश्नांना वाचा फोडली हे एक स्त्रीमुक्ती आंदोलनाचे पहिले पाऊलच म्हणावे लागेल. त्यावेळी भारतात इंग्रजांचे राज्य होते. अगोदरच परकीयांचे राज्य, पुन्हा त्यात सामाजिक बंधने, वाईट चालिरिती यातून सूटका करण्याचे महान कार्य समाजसुधारकांनी केले. हिंदू स्त्रीवरील सामाजिक अन्यायाविरूद्ध बंगालमध्ये राजा राम मोहन रॉय, पं. इश्वरचंद विद्यासागर, महाराष्ट्रात ज्योतीबा फुले, गोपाळ गणेश आरकर यासारखे अनेक खंदे समाज सुधारक बंड करून उभे राहिले. स्त्रियांच्या प्रश्नांकडे इंग्रज सरकारचे लक्ष वेधून या समस्या सोडविण्यासाठी सरकारला कायदे करायला भाग पाडले. त्यामुळे स्त्रियांच्या बाबतीत एकदम सर्वच क्षेत्रात परिवर्तन झाले असे नाही, तर समाजाचा आधारभूत घटक म्हणून स्त्री प्रश्नांकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री प्रश्न भयानक स्वरूपात होते. कौटुंबिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक या क्षेत्रात हे प्रश्न असल्यामुळे त्याचा स्त्रियांच्या परिस्थितीवर कसा परिणाम झाला यावर चिंतन होणे गरजेचे आहे.

वैदिक काळातील सुधारित स्त्री जीवनाकडून उत्तर वैदिक काळातील दूर्दैवी स्त्री जीवनाचा प्रवास अत्यंत खडतर होता. या प्रवासाला अंतच नव्हता, पण भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली. त्यांनी केलेल्या सुधारणा, धोरणांचे संपूर्ण समाजावर परिणाम घडून आले. स्त्री जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात फरक पडला. सन १७५५ ते १८५७ या १०० वर्षात भारतात ब्रिटिशांची राजवट स्थिर झाली. बंगाल, म्हैसूर, अवध, पंजाब, महाराष्ट्र या प्रांतातील स्थानिक सत्ता नष्ट केल्या व त्या आपल्या सार्वभौमत्वाखाली आणल्या. दत्तक वारसा नामंजूर करून त्यांनी संस्थाने खालसा केली. सन १८५७ पर्यंत ८० टक्के भारत ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली होता. या कालखंडामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणावर भर दिला जाऊ लागला. स्त्रियांचे जीवन ज्या अनिष्ठ रुढी, परंपरांनी बांधले गेले होते त्यात हस्तक्षेप करावा की नाही याबद्दल ब्रिटीश सांशक होते. परंतु आचार्य

बाळशास्त्री जांभेकर, आगरकर, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, दादोबा पांडूरंग वगैरे अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. सुधारणावादी वृत्ती व संस्था यांच्या प्रयत्नातून स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात मोठा बदल घडवून आणला. ब्रिटीशांच्या सुधारणावादी धोरणांचे स्त्री जीवनावर परिणाम झाले.

प्रत्येक देशात अर्धी मानवी शक्ती ही स्त्री शक्ती आहे. पुरुषाप्रमाणेच स्त्रीया देशाच्या विकासाला हातभार लावतात. पण या संस्कृतीने स्त्रीशक्तीला बंदीस्त केले आणि स्त्रीशक्ती आडगळीस पडली. याचे गंभीर परिणाम पुढे दिसून आले. दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्रियांच्या प्रश्नांना चालना मिळाली. या संदर्भात विचार मंथन सुरु झाले. यासाठी सामाजिक संघटना, महिला संघटना, स्वयंसेवी संघटना, सामाजिक विचारवंत पुढे आले. जागतिक पातळीवर या समस्यांवर चर्चा होऊ लागली. सुरुवातीला या प्रश्नाकडे सहानुभूतीने पाहण्यात येऊ लागले. त्यानंतर मात्र मानवी अधिकाराच्या कक्षेतून पाहिले जाऊ लागले. ही शक्ती देशाच्या विकासात मोलाची असल्यामुळे तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे ओळखून स्त्री प्रश्नांबाबत प्रत्येक देश विचार करू लागला व स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाय योजना, कायदे, निर्णय घेण्यास भाग पडले.

हिंदू समाजातील सगळ्या प्रकारच्या विषमतांपैकी एक, म्हणजे स्त्री-पुरुष विषमता. तिच्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वापरलेले महत्त्वाचे अस्त्र म्हणजे कायदा स्वतःचे सारे पांडित्य त्यांनी हिंदू कोड बिलासाठी पणाला लावले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्याची संहिता आधी बदलली पाहिजे व स्त्री-केंद्री बनविली पाहिजे, हा त्यामागील हेतू होता. हिंदू कोड बील हे सर्व जाती, संप्रदाय, वीर-शैव, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राह्मण, लिंगायत, बौद्ध जैन आणि शिख या सर्वांनाच लागू करण्यात आला होता.

भारतीय समाज रचनेमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले होते. त्यांना त्यांच्या हक्कापासून वंचीत ठेवण्यासाठी समाजामधे अनेक प्रथा परंपरा अस्तित्त्वात होत्या. या कारणाने समाजातील अत्यंत महत्त्वाचा स्त्रीवर्ग हक्क व आधिकारापासून वंचित राहत होता. म्हणजेच समाजाची एक बाजू कमकुवत बनत होती. भारतीय समाजाला

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

स्वातंत्र्योत्तर काळात जर वेगाने आर्थिक, सामाजिक, राजकिय विकास साध्य करायचा असेल तर त्यासाठी स्त्री व पुरूष हे दोन्ही घटक समान आणने गरजेचे होते तरच स्वातंत्र्यानंतर विकासाचे स्वप्न साकार करता येणार होते. स्त्रीयांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेऊन भारतीय समाज प्रगती करू शकत नव्हता. पण भारतीय समाजातील प्रथा व परंपरा ह्या समाजास चिटकून होत्या त्यांना धार्मिक वृत्तीचा चांगला आधार होता तो मोडून काढण्यासाठी एक चांगल्या कायद्याची गरज भासत होती म्हणून "हिंदू कोड बील" संस्थेमधे आणले गेले. १९५२ च्या निवडणुकित काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले व डॉ. राजेंद्र प्रसाद पुन्हा राष्ट्रपती झाले. पहिल्या लोकसभेने १९५५-५६ मधे हिंदू कोड बील पास केले. त्यामधे हिंदू विवाह कायदा, हिंदू अल्पसंख्यांक कायदा, दत्तक विधान इत्यादी कायद्याचा समावेश करण्यात आला. म्हणजेच स्त्रीयांची समाजमान्य रूढी व प्रथामधून मुक्तता करण्यासाठी या बिलाची निर्मिती केली गेली. या बिलास समाजातील अनेक रूढीवादी व परंपरावादी लोकांनी विरोध केला. त्यामधे डॉ. राजेंद्र प्रसाद हे या बीलाच्या जास्त विरोधात होते आणि यामुळे डॉ. राजेंद्र प्रसाद व पंडित नेहरू यांचे संबंध ताणले गेले.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद हे दोन्ही नेते. काँग्रेस मध्ये मुख्य नेते म्हणून ओळखले जात असत. देश स्वातंत्र्य झाल्यावर देशाला आकार देण्याचे व राष्ट्र उभारणीच्या कार्यात या दोन्ही नेत्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पण हिंदू कोडबीलाच्या मुद्यावर मात्र या दोघांचे एक मत असल्याचे दिसत नव्हते व त्यांच्यामध्ये तणाव हा वाढत होता. पंडित नेहरू हे पाश्चिमात्य शिक्षण घेतलेले, आधूनिक समाजवादी विचार असलेले नेते होते. त्यांच्या मनात धार्मिकता नव्हती. त्यांच्यामते धार्मिकता ही भारतातील अनेक समस्यांचे मुळ आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते धर्म बाजूला ठेवत प्रत्येक भारतीय व्यक्तीने वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारला पाहीजे अशी त्यांची धारणा होती. पंडित नेहरूच्या मते धर्म ही देशाची दूय्यम गरज आहे. देशाची प्राथमिक गरज ही उद्योग, व्यवसाय, विकसित शहर, आधुनिक हॉस्पीटल ही असून त्यांचा विकास होण अत्यंत गरजेच आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

डॉ. राजेद्र प्रसाद यांचा स्वभाव हा नेहरूंच्या विरोधी असल्याचे दिसते. त्यांचा भारतीय संस्कृतीवर व तिच्या गौरवशाली परंपरेवर प्रचंड विश्वास होता. त्यांच्या मनात लोकांच्या श्रद्धेप्रति आदरभाव होता. त्यांना प्रथा व रूढी परंपरावर कुठलेही अतिक्रमण नको होते. नेहरू व डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यातील वादाचा मुद्दा म्हणजे भारतीय राज्यघटनेतील "हिंदू कोड बील" आणि धर्माचे समाजातील असलेले महत्त्व हा होता.

डॉ. राजेंद्र प्रसाद आणि पंडीत नेहरू यांच्यात वाद निर्माण झाला तो "हिंदू कोड बीला" वरून. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाचा मसूदा ऑक्टोबर १९४७ रोजी संविधान सभेसमोर ठेवला. त्या मसुद्याला पंडीत नेहरू यांनी पाठिंबा दिला होता. म्हणजेच त्यामधे असणाऱ्या हिंदू कोड बीलाला देखील नेहरूंनी समर्थन दिले होते. पण डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी हस्तक्षेप करून असे सूचवीले की हिंदु कोड बीलावर जनमत जाणून घेतले पाहीजे. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या मते, परंपरा ह्या समाजात रूजलेल्या असतात. त्यासाठी हिंदू कोड बीलास जनतेची स्वीकृती मिळावी यासाठी लोकांनी ते बिल स्वीकृत केले पाहिजे असे त्यांना वाटत असे. हि चर्चा जेव्हा बाहेर वाऱ्यासारखी पसरली. तेव्हा परंपरावादी लोकांनी त्यास विरोध केला. याची कल्पना पंडीत नेहरूंना होती. परंतु नेहरूंनी त्याच्यावर खंबीर भूमिका घेऊन हिंदू कोड बील संसदेमध्ये पास करून घेण्यासाठी प्रयत्न केले. हिंदू कोड बिल पास करण्यासाठी संपूर्ण परिणाम व दोष स्वतःच्या माथी मारून घेण्यास पंडीत नेहरू तयार होते.

पंडित नेहरूंच्या या भुमिकेमुळे डॉ. राजेंद्र प्रसाद यांना राग आला व त्यांनी एका पत्रात पंडीत नेहरूंना अन्यायी व लोकशाही विरोधी असे म्हटले आहे. एवढे नेहरू व राजेंद्र प्रसाद यांचे संबंध बिघडले होते. त्यामध्ये सरदार पटेल यांनी सांमजस्यपणाची भूमिका घेऊन हा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. सप्टेंबर १९४७ मध्ये राष्ट्रपती पदाच्या निवडणूका होणार होत्या. सरदार पटेल यांची डॉ. राजेंद्र प्रसाद हे राष्ट्रपती व्हावेत अशी इच्छा होती तर पंडीत नेहरू यांना राजगोपालचारी हे राष्ट्रपती व्हावेत असे वाटत होते.

सरदार पटेल आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा काँग्रेसवर चांगला ताबा होता. सरदार पटेल यांना निवडणूकी अगोदर नेहरूबरोबर कोणताच वाद नको होता. कारण पंडित नेहरू काँग्रेसचा चेहरा होते. तसे ते जनतेतील सर्वात लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जात होते. डॉ. राजेंद्र प्रसाद भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवडले गेले. २६ जानेवारी १९५० ला राजेंद्र प्रसाद यांनी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला. संविधान सभा संविधानाच्या पूर्तते बरोबर कामाला लागली. १९५०-५२ च्या काळात निवडणुकाआधी हिंदू कोड बिलावर चर्चा सुरु झाली.

संसदेच्या बाहेर हिंदू कोड बिला विरूद्ध वातावरण पेटले होते. संत करपात्रिजी महाराज यांच्या नेर्तृत्वाखाली धार्मिक गट एकत्र आले होते. त्यांनी हजारो संतासोबत आणि श्रद्धाळूसोबत संसदेवर मोर्चा काढला. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी पंतप्रधान नेहरू यांना पत्राद्वारे कळवले की, संसद देशाला योग्य प्रकारे भूषित करत नाही. त्यानंतर दुसरे पत्र लिहून असे सूचित केले की, जर सरकार हिंदू कोड बिल पास करत असेल तर त्यामध्ये फक्त हिंदूंचाच समावेश का? त्यामध्ये प्रत्येक धर्माचा समावेश करण्यात यावा. सर्वांना समान कायदा आणि समान व्यवस्था हवी. परंतु नेहरूचे यावरील विचार धर्मनिरपेक्ष होते. त्यांच्या मते अल्पसंख्यांक समुदायाला बहूसंख्यांक हिंदूंच्या तुलनेत काही सुरक्षा अधिकार मिळावेत यामुळे त्यांनी राजेंद्र प्रसाद यांचे मत विचारात घेतले नाही. पण डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी यामध्ये वैयक्तिक सहभाग घेण्याची भूमिका घेतली आणि सांगितले की, जरी हे बिल पास झाले तरी मी त्याच्यावर स्वाक्षरी करणार नाही. ना नेहरू ऐकण्यास तयार होते ना डॉ. राजेंद्र प्रसाद. नेहरूनी त्यांच्या पत्रात उल्लेख केला की, या बिलास मोठ्या प्रमाणावर पाठिंबा आहे व नेहरूंनी संविधान तज्ञाकडून माहिती घेतली. प्रत्येकाने त्यांना कळवले की, जर संसदेमध्ये बहूमताने कोणताही ठराव पास होत असेल तर राष्ट्रपती त्यास विरोध करू शकत नाही. असे असले तरी नेहरूंनी संयमाची भूमिका घेतली व बिल पास न करता निवडणूकीची वाट पाहिली. कारण त्यांना काँग्रेसची एकात्मता टिकवायची होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नेहरूंनी केलेली दिरंगाई पटली नाही. त्यांनी १९५१ साली आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला. १९५२ सालच्या निवडणुकीत, काँग्रेसला प्रचंड बहूमत मिळाले. राजेंद्र प्रसाद राष्ट्रपती झाले. पहिल्या लोकसभेने १९५५-५६ मध्ये हिंदू कोड बिल पास केले. त्यामध्ये हिंदू विवाह कायदा, दत्तक विधान इत्यादी कायद्याचा समावेश करण्यात आला.

**विषयाची निवड व महत्त्व :**

भारतीय समाजामध्ये स्त्रीयांचा दर्जा खालच्या पातळीवरील होता. त्यांना रुढी, प्रथा व परंपरा यांच्यामध्ये आडकवून ठेवले होते. म्हणजेच त्यांना समान अधिकार, समान संधी, विवाह, दत्तक व वारस, घटस्फोट, पोटगी या विषयी कसलेच अधिकार नव्हते. हे सर्व अधिकार देण्यासाठी 'हिंदू कोड बिलाची' निर्मिती करण्यात आली. या हिंदू कोड बिलास परंपरावादी लोकांचा विरोध होता तो मोडून काढून हे बिल पास करणे मोठे आव्हान होते. त्याचबरोबर काँग्रेसमधील मोठे नेते डॉ. राजेंद्र प्रसाद शेवटपर्यंत विरोधात होते. हिंदू कोडबिलाविषयी या दोन नेत्यांची भूमिका कशी होती व त्यांच्या भूमिकेत किती महत्त्व याचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्यासाठी "हिंदू कोड बिल - डॉ. राजेंद्र प्रसाद व जवाहरलाल नेहरू यांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय निवडला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) तत्कालीन परिस्थिती महिलांच्या विकासाची स्थिती जाणून घेणे.

२) हिंदू कोड बिलास होणारा विरोध जाणून घेऊन हिंदू कोड बिलाची समाजशास्त्रीय अभ्यास करणे.

३) हिंदू कोड बिलास असणारे समर्थन तपासणे.

४) हिंदू कोड बिला विषयी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भूमिका नेमकी काय होती हे जाणून घेणे.

**गृहितके :**

१) हिंदू कोड बिलाच्या अगोदर महिलांना अनेक हक्कांपासून वंचीत राहावे लागत होते.

२) हिंदू कोड बिल भारतीय समाजातील महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी गरजेचे आहे.

३) तत्कालीन परिस्थितीत हिंदू कोड बिलास मोठ्या प्रमाणावर विरोध झाला.

४) हिंदू कोड बिलास पुरोगामी लोकांचे समर्थन होते पण डॉ. राजेंद्र प्रसार यांनी शेवटपर्यंत हिंदू कोड बिलास विरोध केला.

**संशोधन पद्धती :**

समाजशास्त्र हा विषय मानव्यविद्या शाखेअंतर्गत अभ्यासला जाणारा एक विषय आहे. त्यामुळे त्यात सामाजिक घटकांचा अभ्यास केला जातो. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन क्षेत्रातील वर्णणात्मक, विश्लेषणात्मक, विवेचणात्मक व ग्रंथनिर्मित संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनात माहितीचे संकलन करून तिचे विश्लेषण केले जाणार आहे. माहितीचे विश्लेषण करत असताना स्तंभालेख, तक्ते इत्यादींचा वापर केला जाणार आहे.

**आधार सामुग्रीचे स्रोत :**

प्रस्तुत संशोधन करत असताना प्राथमिक व दुय्यम सांधनाद्वारे आधार सामुग्रीचे संकलन करण्यात येणार आहे.

**प्राथमिक स्रोत :**

प्राथमिक आधार सामुग्रीमध्ये संशोधन विषय क्षेत्रातील मुळ लिखाण दस्तऐवज, प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची निरिक्षण व सर्वेक्षण इत्यादी साधनांद्वारे आधारसामुग्रीचे संकलन करण्यात येणार आहे.

**दुय्यम स्त्रोत :**

प्रस्तुत विषयी संशोधन करत असताना दुय्यम स्वरुपाची साधनसामुग्रीमध्ये प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, चरित्र ग्रंथ, प्रबंध, शोधनिबंध, लघुशोध प्रबंध, पुस्तके, मासिके, तत्कालीन वृत्तपत्रे, विविध अहवाल इत्यादी साधनांद्वारे आधार सामुग्रीचे संकलन करण्यात येणार आहे.

**अध्ययनाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व खालील बाबीवरून लक्षात येते.

१) सदरील संशोधनामुळे पूर्वी स्त्रियांची दयनिय स्थिती होती हे सर्वांच्या लक्षात येईल.

२) प्रस्तुत संशोधनामुळे हिंदू कोड बिल म्हणजे काय हे सर्व लोकांना माहिती होईल.

३) प्रस्तुत संशोधनामुळे हिंदू कोड बिल लागू करण्यामध्ये डॉ. आंबेडकरांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे लक्षात येईल.

४) प्रस्तुत संशोधनामुळे हिंदू कोड बिलामध्ये जे स्त्रीयांसाठी हक्क व अधिकार सांगितले आहेत त्याची प्रभावी अमंलबजावणी करता येईल.

**सारांश :**

भारतीय समाजामध्ये प्रामुख्याने पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा असल्याचे दिसून येते. भारतामधील पुरातन समजल्या जाणाऱ्या धर्मग्रंथांनी, रुढी परंपरांनी पुरुष प्रधान संस्कृतीची बीजे भारतीय समाज जीवनामध्ये रुजविलेली दिसून येतात. याला अपवाद फक्त केरळमधील नायर, मंगरुळमधील शेट्टी, बंगालमधील समाज व भारतातील काही भटक्या व आदिवासी जमातीमध्ये स्त्री प्रधानतेचे प्रमाण पाहावयास मिळत असून महिलांना त्या-त्या जाती जमातीमध्ये पुर्णपणे पुरुषांच्या बरोबरीने अधिकार उपभोगण्याची मोकळीक असल्याचे दिसून येते. परंतु असे असले तरी बहूतांश भारतीय समाज जीवनामध्ये स्त्रीयांना दुय्यम स्थान असण्याचे प्रकर्षाने जाणवते. पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा निर्माण करून महिलांवर विविध बंधने घालणाऱ्या रुढी, परंपरा व धार्मिक ग्रंथाची बनवेगिरी उघड झाल्यावर या विरूद्ध बंड करून महिलांना त्यांचे अधिकार बहाल

करण्याच्या अनुषंगाने ज्या स्त्री मुक्ती चळवळीचा आरंभ भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सुरु झालेला होता त्यातून धार्मिक ग्रंथ, रुढी व परंपरांमुळे स्त्रियांवर होणारे अन्यायाविरूद्ध, शोषणाविरूद्ध तसेच त्यांच्या न्याय व अधिकारासाठी जे प्रयत्न केले त्यामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका होती ती डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांची त्यांनी स्त्रीयांना त्यांचे अधिकार प्राप्त होण्यासाठी भारतीय संविधानामध्ये विविध तरतूदी केल्या तसेच सर्व राजकीय नेत्यांचा हिंदू कोड बिलाला विरोध असतानाही अत्यंत ताकदीने हे बील सर्वासमोर प्रभावीपणे पटवून दिले व शेवटी ते मान्य करायला भाग पाडले. हिंदू कोड बील हे भारतातील सर्व समाजातील स्त्रीयांच्या हक्क व अधिकारासाठी अत्यंत महत्त्वाचे असे बील होते. त्यामागचा डॉ. आंबेडकरांचा हेतू अगदी चांगला होता. समाजामध्ये स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हावी. भारतीय समाजामध्ये स्त्रीया ह्या कोणत्याही हक्क व अधिकारापासून वंचित राहील्या न पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अशी धारणा होती की, भारताला विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर भारतामध्ये स्त्री-पुरुष समानता असायला हवी. हे दोन्ही घटक समान असायला हवे. कारण स्त्रीयांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवून कोणताही समाज प्रगती करू शकत नाही. परंतु भारतीय समाजातील प्रथा व परंपरा ह्या समाजास चिकटून होत्या त्यांना धार्मिक वृत्तीचा चांगला आधार होता. तो मोडून काढण्यासाठी एक चांगल्या कायद्याची गरज भासत होती म्हणून हिंदू-कोड-बीलाचा प्रस्ताव मांडण्यात आला.

ज्यावेळी १९५२ च्या निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड बहूमत मिळाले व डॉ. राजेंद्र प्रसाद पुन्हा राष्ट्रपती झाले. पहिल्या लोकसभेने १९५५-५६ मध्ये हिंदू कोड बील पास केले. त्यामध्ये हिंदू विवाह कायदा, हिंदू अल्पसंख्यांक कायदा, दत्तक विधान इत्यादी कायद्याचा समावेश करण्यात आला. म्हणजेच स्त्रीयांची समाजमान्य रुढी व प्रथामधून मुक्तता करण्यासाठी या बीलांची निर्मिती केली गेली. या बिलास समाजातील अनेक रुढीवादी व परंपरावादी लोकांनी विरोध केला. त्यामध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद हे या बिलाच्या जास्त विरोधात होते आणि यामुळे डॉ. राजेंद्र प्रसाद व पंडीत नेहरू यांचे संबंध ताणले गेले.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

**संदर्भ ग्रंथसूची :**


१) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती-६ डिसेंबर २००६.

२) गणवीर रत्नाकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील, नेहा प्रकाशन.

३) शिरूरकर, ॲड. के. टी., हिंदू वारसा कायदा, १९५६ श्री अशोक ग्रोवर ॲण्ड कंपनी, पुणे.

४) Dr. Ambekar "Hindu Code Bill act Dr. Ambedkar", Samyak Prakashan. २००९.

५) घोरपडे सुरेश, "हिंदू कोड बिल आणि डॉ. बाबासाहेब", सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, २०१५.

६) लीला पाटील, "डॉ. आंबेडकर स्त्री मुक्ती चळवळीची प्रेरक शक्ती फुले आंबेडकरी स्त्री चळवळ", समता प्रकाशन, नागपूर. २०१४.

७) नानक चंदू रत्तू, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी", साकेत प्रकाशन, २०००.